Test Booklet No.
परीक्षा पुस्तिका संख्या

43342

This booklet contains 16 pages.
इस पुस्तिका में 16 पृष्ठ हैं ।

# JBC – 12A

## PAPER I / प्रश्न-पत्र I
## PART IV & V / भाग IV & V
## Marathi Language Supplement
## मराठी भाषा परिशिष्ट

Test Booklet Code
परीक्षा पुस्तिका संकेत

**F**

**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 15 & 16) of this Test Booklet.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 15 व 16) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**

**For instructions in Marathi see Page 2 of this booklet. / मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें ।**

### *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts I, II, III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue / Black Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **F**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part IV : Language I – (Marathi) *(Q. 91 to Q. 120)*
   Part V : Language II – (Marathi) *(Q. 121 to Q. 150)*
7. Part IV contains 30 questions for Language I and Part V contains 30 questions for Language II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language I and/or Language II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part V (Language II) in a language other than the one chosen as Language I (in Part IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

### *परीक्षार्थियों के लिए निर्देश*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **F**. यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य प्रश्न पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग IV : भाषा I — (मराठी) *(प्र. 91 से प्र. 120)*
   भाग V : भाषा II — (मराठी) *(प्र. 121 से प्र. 150)*
7. भाग IV में भाषा I के लिए 30 प्रश्न और भाग V में भाषा II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा I और/या भाषा II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिएँ।**
8. **परीक्षार्थी भाग V (भाषा II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

SEAL

Name of the Candidate (in Capitals) : ____________________
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में ) :
Roll Number (अनुक्रमांक) : in figures (अंकों में) ____________________
: in words (शब्दों में) ____________________
Centre of Examination (in Capitals) : ____________________
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में ) :
Candidate's Signature : ____________________ Invigilator's Signature : ____________________
परीक्षार्थी के हस्ताक्षर : निरीक्षक के हस्ताक्षर :
Facsimile signature stamp of Centre Superintendent ____________________

**ही पुस्तिका 16 प्रष्ठ आहे.**

# JBC – 12A

**चाचणी पुस्तिका कोड**

**F**

**प्रश्नपत्रिका I**
**भाग IV आणि V**
**मराठी भाषा पुरवणी**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**
**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (15 आणि 16) सूचना काळजीपूर्वक वाचा.**
***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग चौथा (भाषा पहिली) **किंवा** भाग पाचवा (भाषा दुसरी) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग पहिला, भाग दुसरा आणि भाग तिसरा सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग चौथा आणि पाचवा सोडवायचा आहे.
3. भाग चौथा आणि पाचवा यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड F** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून ध्या. जर काही विसंगती असेल त. परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत चौथा आणि पाचवा असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग चौथा : भाषा पहिली – (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*
   **भाग पाचवा : भाषा दुसरी – (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग चौथा मध्ये भाषा पहिली साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग पाचवा मध्ये भाषा दुसरी साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा पहिली व/वा भाषा दूसरी साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग पाचवा (भाषा दुसरी) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा पहिली (चौथ्या भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये ____________________

: शब्दांमध्ये ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________

पर्यवेक्षकाची सही ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

परीक्षार्थींनी जर **भाषा पहिली** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग IV
# भाषा I
# मराठी

*सूचना : खाली दिलेली कविता वाचा आणि सर्वोत्कृष्ट पर्याय निवडून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची (प्रश्न सं. 91 ते 96), उत्तरे द्या.*

माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा;
हिच्या संगाने जागल्या दऱ्याखोऱ्यातील शिळा.
हिच्या कुशीत जन्मले काळे कणखर हात;
ज्यांच्या दुर्दम धीराने केली मृत्यूवरी मात.
नाही पसरला कर कधी मागायास दान;
स्वर्णसिंहासनापुढे, कधी लवली ना मान.
हिच्या गगनात घुमे, आद्य स्वातंत्र्याची दवाही;
हिच्या पुत्रांच्या बाहूत आहे समतेची ग्वाही.
माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा;
हिच्या संगे जागतील मायदेशातील शिळा.

**91.** "लावा ललाटास टिळा" यातील अधोरेखित शब्दाचा अर्थ :
(1) मूर्तीला
(2) तसबिरीला
(3) शिळेला
(4) कपाळाला

**92.** "कधी लवली ना मान" यातील 'मान' या शब्दाचा अर्थ खालील पर्यायांपैकी कुठला आहे ?
(1) अन्यायापुढे मान झुकवू नये.
(2) तू त्यांचं म्हणणं मान.
(3) विद्यार्थ्यांनी शिक्षकांना मान द्यावा.
(4) मान सांगावा जनात अपमान ठेवावा मनात.

**93.** "नाही पसरला कर" या ओळीचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.
(1) भरभर काम कर
(2) भीक न मागणे
(3) कर भरणे
(4) कर हा करी धरला शुभांगी

**94.** त्यांना मृत्यूवर विजय कशामुळे मिळाला ?
(1) त्यांनी कुणासमोरही मान न झुकवल्यामुळे
(2) त्यांनी कुणाकडूनही दान न घेतल्यामुळे
(3) त्यांच्या प्रचंड धीरामुळे
(4) मराठी मातीचा टिळा लावल्यामुळे

**95.** कवी मराठी मातीचा टिळा लावायला सांगतो कारण
(1) त्याला मातीचे टिळे कुंकवाच्या टिळ्यापेक्षा आवडतात
(2) मातीचा टिळा लावला तर दान नक्की मिळते
(3) मराठी मातीचा टिळा आरोग्यदायी असतो
(4) मराठी प्रदेशात खूप महान माणसे होऊन गेली

**96.** स्वर्णसिंहासनापुढे म्हणजे
(1) सोन्याचे सिंहासन बनवणाऱ्या सोनारापुढे
(2) सत्तेपुढे
(3) संपत्तीपुढे
(4) सोन्याने मढलेल्या मूर्तीपुढे

*सूचना : खाली दिलेला उतारा वाचा आणि त्याखालील प्रश्नांची (प्रश्न सं. 97 – 105) उत्तरे देण्यासाठी बरोबर पर्यायावर खूण करा.*

एका गावात संत गाडगेबाबांच्या कीर्तनासाठी अपार जनसमूह दाटला होता. त्यावर निजामाच्या अधिकाऱ्यांनी शांतताभंग होईल म्हणून बंदी घातली. लोकांच्या उत्साहावर पाणी पडलं. अधिकारी आले. जनसमुदाय भेदरून गेला. बाबा शांत होते. अधिकारी गरजला, "आज कीर्तन करायचं नाही." बाबा म्हणाले, "तुम्ही मुसलमान आहात ना ?" अधिकारी म्हणाला, "हो."

- "कुराण वाचता ?"
- हो.
- कुराणात काय लिहिलं आहे ? ही दुनिया कोणी बनवली ?
- अल्लानी.
- मुसलमान कोणी बनवला ?
- दुसरे कोण बनवणार ?
- आणि हिन्दू ?
- तो ही त्यानीच बनवला.

- अधिकारी नकळत बाबांच्या प्रश्नांमध्ये गुंतत चालला होता. बाबा म्हणाले, "आता एक शेवटचा प्रश्न. मृत्यूनंतर तुमचं काय होईल ?"
- माती.
- आणि हिन्दूंच्या शरीराचं ?
- "वा, असं कसं ? त्यांचीही मातीच होते." बाबा गालातल्या गालात हसत म्हणाले, "आता संध्याकाळ झाली आहे. तुम्हाला नमाज पढायचा नाही का ?"
- "हो हो पढायचा आहे नं !"
- अच्छा, मग आम्ही प्रार्थना करू ?
- का नाही ? कीर्तन करायला बंदी आहे, प्रार्थना करायला नाही.

बाबा लोकांना उद्देशून म्हणाले, ऐकलं का ? यांनी आपल्याला भजन करायला परवानगी दिली आहे. बोला सगळे, "देवकीनंदन गोपाळा !" सगळा समूह गर्जू लागला. त्या बिचाऱ्या अधिकाऱ्याला समजलच नाही की बाबांनी कीर्तन केलं सुद्धा ! त्याच्याच परवानगीनी, त्याच्याच डोळ्यादेखत बाबा कीर्तन करून मोकळे झाले. गदागदा हसत बाबा म्हणाले, "त्या बिचाऱ्याला वाटलं की किर्तन म्हणजे तबला, बाजाची पेटी, टाळ, मृदुंग असं सगळं लागतं. पण खऱ्या कीर्तनकाराला टाळां ऐवजी हातात दोन दगड घेतले तरी चालतं. फक्त मनात देव असला म्हणजे झालं."

**97.** निजामाला कसली भीती वाटत होती ?

(1) कीर्तनाची

(2) मोठ्या आवाजाची

(3) हिन्दूंची

(4) शांतताभंग होण्याची

**98.** अधिकाऱ्यांना पाहिल्यावर गाडगेबाबांची प्रतिक्रिया काय झाली ?

(1) ते शांत होते

(2) ते आनंदित झाले

(3) ते भेदरले

(4) ते दचकले

**99.** खरा कीर्तनकार कसा असतो ?

(1) तो तत्त्वज्ञानी असतो

(2) त्याच्या मनात देव असतो

(3) त्याचे संगीतावर प्रभुत्व असते

(4) त्याच्याजवळ तबला, बाजाची पेटी, टाळ, मृदुंग असा सर्व संच असतो

**100.** "जनसमूह दाटला होता" म्हणजे

(1) लोकांनी अनेक गट केले होते

(2) जनसमुदायात अनेक प्रकारचे लोक होते

(3) प्रचंड लोक जमले होते

(4) छोट्या जागेत लोक दाटीवाटीने बसले होते

**101.** लोकांच्या उत्साहावर पाणी पडलं कारण

(1) निजामाच्या अधिकाऱ्यांनी कीर्तनावर बंदी घातली

(2) त्यांना कीर्तन ऐकायला मिळालं नाही

(3) गाडगेबाबा आलेच नाहीत

(4) गाडगेबाबांनी कीर्तन करण्यास नकार दिला

**102.** बाबांनी निजामाच्या अधिकाऱ्याला त्याच्या धर्माविषयी प्रश्न विचारायला सुरुवात केली कारण

(1) हिन्दू-मुसलमान सारखेच आहेत हे त्याला पटवायचं होते

(2) त्याला खूष करायचं होते

(3) त्यांना कीर्तनासाठी परवानगी हवी होती

(4) त्यांना मुसलमानांच्या धर्माबद्दल संशोधन करायचं होते

**103.** 'गदागदा हसणे' म्हणजे

(1) मंद स्मित करणे

(2) गालातल्या गालात हसणे

(3) खुदकन हसणे

(4) खूप जोरात हसणे

**104.** 'उत्साहावर पाणी पडणे' म्हणजे

(1) जोरदार पाऊस पडणे

(2) पाणी पाहून उत्साह येणे

(3) जोम येणे

(4) निराश होणे

**105.** भेदरलेला म्हणजे

(1) रागावलेला

(2) गोंधळलेला

(3) भादरलेला

(4) घाबरलेला

*सूचना : योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.*

**106.** भाषा-अध्ययनातला कसोटीचा काळ म्हणजे

(1) कोणत्याही भाषिक प्रकल्पाच्या तयारीसाठी लागणारा काळ

(2) भाषेच्या वापराचा भरपूर सराव करण्यासाठी ठरवून दिलेला विशिष्ट काळ

(3) जेव्हा इतर कुठल्याही काळापेक्षा भाषा अधिक सुलभतेने शिकता येते

(4) वर्गामध्ये सर्वंकष मूल्यमापन होण्यापूर्वीचा काळ

**107.** सारांश लिहिण्यासाठी आवश्यक असणारी दोन कौशल्ये म्हणजे

(1) महत्त्वाचे आणि गौण मुद्दे शोधणे आणि कल्पनांचा क्रम समजून घेणे

(2) योग्य अव्यये वापरून अचूक लिहिणे

(3) शब्दांऐवजी चिह्ने वापरणे, अचूक लिहिणे

(4) स्वतःच्या शब्दात मजकूर पुन्हा लिहिणे

**108.** विद्यार्थ्याला निरनिराळ्या 'काळांची रूपे' ओळखायला अवघड जात असतील तर खालील उपाययोजना करता येतील

(1) वर्गाबाहेरपण या रचना शिकणे

(2) विद्यार्थ्याने प्रत्यक्ष जीवनात वापरल्या जाणाऱ्या रचनांचा सराव करणे

(3) काही विशिष्ट वाक्यरचनांचा सराव करण्यासाठी भरपूर संधी उपलब्ध करून देणे

(4) विद्यार्थ्यांनी स्वतः वाक्ये तयार करणे आणि शिक्षकांनी त्यांना या कृतीत मार्गदर्शन करणे

**109.** सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची (CCE) सुरुवात झाल्यामुळे

(1) शैक्षणिक उपक्रमांवर अधिक भर देता येतो

(2) शिक्षक विद्यार्थ्यांवर अधिक नियंत्रण ठेवू शकतात

(3) विद्यार्थ्यांचे मूल्यांकन नियमितपणे केले जाते

(4) विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांचा आनंद घेता येतो

**110.** सर्जनशील वाचनाची उदाहरणे ही आहेत

(1) नाट्यीकरण भूमिकाभिनय व वेगळ्या दृष्टिकोनातूना पुनर्लेखन करणे

(2) समजपूर्वक वाचन करणे

(3) संबंधित विषयाच्या अधिक माहितीसाठी ग्रंथालयातून संदर्भ शोधणे

(4) संबंधित माहितीसाठी इंटरनेटचा उपयोग करणे

**111.** (पाठ) चाळणे म्हणजे काय ?

(1) सुसंबद्ध माहिती वाचनातून लिखित रूपात संक्रमित करणे

(2) वाचन करताना कल्पना, ध्वनितार्थ किंवा मुद्यांची सुसूत्र मांडणी करणे

(3) पाठाचा साधारण आशय, मध्यवर्ती कल्पना व सारांश लक्षात येण्यासाठी वरवर नजर टाकणे

(4) असंबद्ध मुद्यांकडे दुर्लक्ष करून एखादी विशिष्ट माहिती शोधून काढण्यासाठी पाठावर नजर फिरवणे

**112.** पाठ्यातील सुसंगती म्हणजे

(1) दीर्घ व अखंड पाठातून कोणतीही माहिती लिहून काढणे

(2) परिच्छेदातील आणि वाक्यांमधील संबंध प्रस्थापित करण्यासाठी सर्वनामे, उभयान्वयी अव्यये किंवा समानार्थी शब्दांचा वापर करणे

(3) गोष्टीच्या निवेदनाशी मिळतीजुळती परिच्छेदांची क्रमबद्ध मांडणी

(4) परिच्छेदातील माहितीचे तर्कसंगत सादरीकरण करण्याची पद्धत

**113.** 'यथार्थ श्रवण' म्हणजे

(1) प्रत्यक्ष किंवा ध्वनिमुद्रित नैसर्गिक संभाषणे ऐकणे

(2) शिक्षकांनी मोठ्याने वाचून दाखवलेली मुद्यांवर आधारित किंवा उत्स्फूर्त भाषणे ऐकणे

(3) दिलेल्या कामासाठी आवश्यक असलेली माहिती एकाग्रतेने ऐकणे

(4) श्रोत्याने आपले काम संपवलेले असते असा श्रवणप्रक्रियेतील टप्पा

**114.** कोणत्या घटकांमुळे लेखन हे भाषणापेक्षा वेगळे ठरते ? लेखनात

(1) व्याकरणिक संरचनांचे काटेकोर पालन केलेले असते

(2) ते बहुधा मुक्तोत्तरी स्वरूपाचे असते

(3) अनावश्यक मजकूर व पुनरावृत्ती नसते

(4) अस्खलितपणावर आधारित कृती अधिक असतात

**115.** इंग्रजीच्या वर्गात संभाषणाला प्रतिसाद देणे म्हणजे

(1) एखाद्याच्या मौखिक किंवा लिखित संप्रेषणाच्या परिणामाबद्दल माहिती देणे

(2) औपचारिक भाषण किंवा स्वगत न करता केलेले संभाषण

(3) भाषेचा वापर, मध्ये न थांबता, उत्स्फूर्तपणे व आत्मविश्वासपूर्वक करणे

(4) श्रोत्याच्या प्रतिसादानुसार आपल्या भाषणामध्ये बदल करणे

**116.** विद्यार्थ्यांच्या भाषण कौशल्याचा विकास करण्यासाठी ध्वनी-अनुक्रमाचा वापर कसा करता येईल ?

(1) व्यंगचित्रे आणि इतर चित्रांचा वापर करून त्यांच्यासंबंधी विद्यार्थ्यांना बोलायला लावणे

(2) विद्यार्थ्यांना कमीत कमी मुद्दे किंवा वाक्प्रचारांवर आधारित स्वतःच्या शब्दात गोष्ट सांगायला लावणे

(3) विद्यार्थ्यांनी ध्वनिमुद्रित केलेले ध्वनी ऐकल्यानंतर त्यांना त्यांचा अर्थ लावण्यास व गोष्टीरूपात समजावण्यास सांगणे

(4) भाषण कृतीशी सुसंगत असे हेतूपूर्वक श्रुतलेखन देणे

**117.** स्वगताद्वारा मूल्यमापन केली जाणारी तीन उपकौशल्ये ही आहेत

(1) आवाजाची जात, शैली, वक्त्याचे व्यक्तिमत्व

(2) वक्त्याचे अनुमान, स्वर, संदर्भ

(3) हावभाव, वक्त्याने काढलेले अनुमान, वक्त्याचे व्यक्तिमत्व

(4) स्वर, आवाजाची जात, वेग

**118.** भाषाग्रहणासाठी अयोग्य वातावरण तिथे असते जिथे

(1) इंग्रजी घरी अजिबात बोलली जात नाही

(2) विद्यार्थ्यांना कसलीही उपलब्धी नसते

(3) हिन्दी/मातृभाषा ही संपर्कभाषा असते

(4) इंग्रजीचा वापर फक्त वर्गापुरताच मर्यादित असतो

**119.** बोधनात्मक शैलीच्या प्रकारांमध्ये पुढीलपैकी कोणत्या जोडीचा समावेश असतो ?

(1) सक्रिय/निष्क्रीय (active/passive)

(2) क्षेत्रसापेक्ष/क्षेत्रनिरपेक्ष (field dependence/field independence)

(3) स्पर्धात्मक/सहभागात्मक (competitive/collaborative)

(4) अर्थनिरूपणात्मक/मूलभूत (interpretative/literal)

**120.** पृच्छाधारित अध्ययन (Enquiry Based Learning — EBL) म्हणजे

(1) प्रबोधनात्मक कार्यनीती जिच्यामध्ये विद्यार्थी सहभागाने समस्येचे निराकरण करतात व आपल्या अनुभवांचे पुन्हा अवलोकन करणे

(2) भाषा-अध्ययनाबाबतचा एक दृष्टिकोन म्हणून ओळखला जाणारा एक सिद्धान्त

(3) कौशल्यांचे पद्धतशीर सादरीकरण व सराव आणि आशयाचे अध्ययन

(4) काल्पनिक-व्यावहारिक (notional-functional) अभ्यासक्रमासारखा अर्थसंबंधित अभ्यासक्रम

परीक्षार्थींनी जर **भाषा दुसरी** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग V
# भाषा II
# मराठी

*सूचना : योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.*

**121.** भाषाग्रहण म्हणजे

(1) मानवी मेंदूच्या उपजत क्षमतेमुळे मातृभाषा किंवा द्वितीय भाषा शिकण्याची प्रक्रिया

(2) विद्यार्थ्यांनी मातृभाषा शिकण्यासाठी लागणारे वातावरण निर्माण करण्याचे तंत्र

(3) आवश्यक शब्दसंपत्तीचे पाठांतर (memorization) आणि वापर (use)

(4) व्याकरणाचे विश्लेषण व आकलन आणि शब्दसंपत्तीचे पाठांतर यांकडे पाहण्याचा पद्धतशीर दृष्टिकोन

**122.** नोम चॉम्स्कीच्या अनुसार अंतस्तरीय संरचना (deep structure) म्हणजे

(1) इंग्रजी ही जगातील सर्वात जास्त वापरली जाणारी सहाय्यकारी भाषा आहे असे मानण्याकडे असणारा कल.

(2) मानवी मेंदूच्या उपजत क्षमतेशी जवळचा संबंध असणारे आणि सर्व भाषांच्या मुळाशी असणारे वैश्विक व्याकरण.

(3) सखोल अभ्यासातून आत्मसात केलेले व्याकरणाच्या अंतस्थ नियमांचे संच.

(4) तौलनिक भाषाविज्ञानातील रुची वाढवण्यासाठी कारणीभूत ठरणारे रचनांतरणवादी व्याकरण.

**123.** अभ्यासक्रमाचे 'बॉटम अप मॉडेल' (bottom up model) म्हणजे

(1) करियरच्या उद्‌बोधनाकडे नेणारी अध्ययन प्रक्रिया

(2) विद्यार्थ्यांवर अप्रत्यक्ष प्रभाव पाडणारे व त्यांच्या गरजेनुसार दिले जाणारे दूरशिक्षण/मुक्तशिक्षण (distance education)

(3) सॉफ्टवेअरच्या संचावर आधारित अध्ययन जे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी अधिक मदतगार बनवते

(4) असा अभ्यासक्रम जो विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातले जास्तीत जास्त उपक्रम करण्याचे स्वातंत्र्य देतो व त्यांना करता करता शिकण्यासाठीही प्रोत्साहन मिळते

**124.** मानवतावादी दृष्टिकोन विशेषतः खालील गोष्टींकडे भर देतो :

(1) विद्यार्थ्यांनी स्वतःच संरचना शोधून काढण्यासाठी त्यांना सक्षम बनवणारी प्रक्रिया

(2) संबंधित आशयाचे सादरीकरण कसे करावे याचा अनुक्रम शिकवणारी प्रक्रिया

(3) सर्व शैक्षणिक विषयांवर त्यांच्या वैशिष्ट्यांसहित प्रभुत्व

(4) शिकलेल्या संरचना, आशय, संकल्पना आणि तत्त्वे यांचा नवीन प्रसंगांमध्ये वापर

**125.** विशिष्ट गरजांसाठी असलेला आदर्श वर्ग

(1) सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना एकत्र आणतो

(2) नेहमीच्या शिक्षकांना मदत करण्यासाठी जास्तीचे शिक्षक असतात

(3) विशेष सजवलेला असतो

(4) वेगळ्या ठिकाणी असतो

**126.** वाचनपूर्व उपक्रमांचा हेतू काय ?

(1) धडयांमध्ये रुची निर्माण करणे

(2) आनंदपूर्ण अध्ययनानुभव देणे

(3) नवे शब्द शिकवणे

(4) विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढवणे

**127.** कधीही हार न मानणे हा दृष्टिकोन बाणवण्यासाठी योग्य अशा उपक्रमात विद्यार्थ्यांनी

(1) विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यात सामना कराव्या लागलेल्या कठीण प्रसंगांचे गटागटाने आलेख तयार केले.

(2) इंग्रजीच्या तासाला बाहेर जाऊन खेळण्याची मुख्याध्यापकांकडून परवानगी मिळवली.

(3) दोन लोकप्रिय गाणी म्हटली आणि आपल्या कलेचे आणि हस्तकलेचे प्रदर्शन पालक-शिक्षक सभेत केले.

(4) त्यांनी आपल्या कागदी विमानांमध्ये सुधारणा केल्या त्या पुन्हा तपासून पाहिल्या आणि ती विमाने दूरवर जावीत म्हणून सर्वात चांगली पद्धत शोधण्यासाठी प्रयोग केले व आंपला शोध एकमेकांना सांगितला.

**128.** प्राथमिक स्तरावर वाचनाचे मूल्यांकन अतिशय परिणामकारक पद्धतीने

(1) मौखिक मुलाखतींद्वारे ते किती वाचताल हे जाणून घेऊन करता येते.

(2) पुस्तकाचे किंवा पाठ्याचे 50 शब्दांपर्यंत मर्यादित परीक्षण लिहिण्याचा छोटा प्रकल्प घेऊन करता येते.

(3) वाक्प्रचार आणि शब्दार्थ यावर आधारित मौखिक प्रश्नमंजुषांद्वारे करता येते.

(4) पाठ्य/गोष्टींमधील प्रसंग आणि व्यक्तिरेखांवर आधारित लिखित चाचण्यांद्वारे करता येते.

**129.** अभ्यासक्रमाच्या विकासामध्ये अनुक्रमाने खालील गोष्टी येतात :

(1) गरजांचे विश्लेषण, उद्दिष्टे ठरवणे, पाठ्य/शिक्षणानुभवांची निवड, मूल्यमापन

(2) उद्दिष्टे ठरवणे, गरजांचे मूल्यांकन, मूल्यमापन, पाठ्य/शिक्षणानुभवांची निवड

(3) उद्दिष्टे ठरवणे, गरजांचे मूल्यांकन, पाठ्य/शिक्षणानुभवांची निवड, मूल्यमापन

(4) पाठ्य/शिक्षणानुभवांची निवड, गरजांचे मूल्यांकन, उद्दिष्टे ठरवणे, मूल्यमापन

**130.** विद्यार्थ्याला दुसऱ्याच्या कृतींमधून अनुभव देणारी माध्यमे ही आहेत

(1) प्रदर्शन फलक, चित्रपटांश

(2) क्षेत्रसहली (field trips), निरीक्षण

(3) प्रत्यक्ष वस्तू व नमुने

(4) अमूर्त शब्द, जीवन वृत्तांत (case study)

**131.** संगणकाकडून आलेल्या सूचनांत (Computer Aided Instructions – CAI) सदृशीकरण (Simulation) पद्धत (Mode) तेव्हा असते जेव्हा विद्यार्थी

(1) पुनरावृत्ती सराव असलेली स्वाध्याय मालिका करतात

(2) प्रयोग-प्रमाद (trial and error) पद्धतीने समस्या सोडवू शकतात

(3) प्रत्यक्ष जीवनानुभवांचा व निसर्गातील घटनांचा अनुभव घेतात

(4) विद्यार्थ्यांना त्वरित मिळालेल्या व प्रश्नांसहित असलेल्या टीकाटिप्पणीतून (feedback) अंशतः माहिती मिळते

**132.** श्रवण उद्दीपक म्हणजे

(1) परीक्षण करण्यासाठी चांगले समालोचन ऐकणे

(2) विद्यार्थ्यांना काम पूर्ण करून सादर करण्यासाठी ऐकायला सक्षम बनवणे (ऐकू देणे)

(3) ऐकलेल्याची देवाण-घेवाण करण्यासाठी एकत्र जमलेल्या विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या समूहांना माहिती पुरवणे

(4) अपुऱ्या माहितीतील त्रुटी शोधून काढण्यासाठी दिशा दाखवण्याचा उपक्रम करणे

**133.** बोलण्याचे (भाषणानुभवाचे) मूल्यांकन करताना एकमेकांबरोबरच्या आदान-प्रदानात (interactional routine) याचा समावेश होतो

(1) दुसऱ्याशी फोनवर बोलणे

(2) मूल्यांकन करणाऱ्याला दोन किंवा अधिक वस्तू/जागा/प्रसंग यांची तुळना करून दाखवणे

(3) अर्थ लावण्याचा प्रयत्न करणे, आळीपाळीने बोलणे व बोलू देणे

(4) शाळा किंवा परिसराचे अनौपचारिक पद्धतीने वर्णन करणे

**134.** लेखनातील पुन:प्राप्ती कौशल्ये ही आहेत

(1) भरपूर संदर्भ शोधण्याची क्षमता

(2) वाचताना/ऐकताना माहितीची मांडणी करणे

(3) एखाद्या गोष्टीची नोंद घेणे व टिपणं काढणे

(4) आकृत्या काढणे व सारांश लिहिणे

**135.** जागरुकता निर्माण करणारे व्याकरणिक खेळ विद्यार्थ्यांना यासाठी प्रोत्साहन देतात

(1) शिक्षक संरचनांवर नियंत्रण ठेवत असताना अर्थाकडे लक्ष देणे व समजून घेणे

(2) दिलेल्या विषयावर शिकलेल्या संरचनांचा वापर करून एकमेकांशी संपर्क साधणे

(3) शिकलेल्या संरचनांचा जाणीवपूर्वक विचार करणे

(4) दिलेल्या उपक्रम पूर्ण करण्यासाठी सहभाग देणे

***सूचना :*** *खाली दिलेला उतारा वाचा आणि त्यानंतरच्या प्रश्नांची (प्र. क्र. 136 ते 144) उत्तरे द्या. त्याकरिता सर्वात जास्त उचित पर्याय वापरा.*

युद्धात विजय मिळाल्यावर राजाने त्या युद्धात मरण

पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना सर्व मदत करण्याची आज्ञा प्रधानाला दिली. कितीही पैसा खर्च झाला तरी तो करण्याची परवानगी ही दिली. प्रधानाने भरपूर पैसा खर्चून सर्व व्यवस्था केल्याचे राजाला सांगितले.

राजा त्यानंतर वेश पालटून रात्री नगरीत फेरफटका मारायला गेला. त्याने एका मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकला. एका झोपडीत एक म्हातारी त्या मुलाची समजूत घालत होती. राजाने विचारले, "आजी, हे बाळ का रडत आहे ?" ती म्हणाली, "त्याला भूक लागली आहे पण घरात धान्याचा एक दाणाही नाही." राजा म्हणाला, "मग चुलीवर काय शिजते आहे ?" ती म्हणाली, "फक्त पाणी उकळायला ठेवलं आहे. त्याला सांगितलं आहे की चुलीवर भात ठेवला आहे. झाला की वाढीन. पाणी उकळण्याचा आवाज ऐकून खोट्या आशेनं रडून रडून तो झोपेल. सकाळी उठून कुठूनतरी मागून आणीन आणि घालीन त्याच्या पोटाला."

राजानी विचारलं, "बाई तुमच्या घरात कोणी मिळवता पुरुष नाही का ?" ती म्हणाली, "बाबा रे, युद्धात माझा एकुलता एक मुलगा म्हणजे याचा बाप कामी आला. युद्धाच्या सुरवातीला राजाचे अधिकारी येऊन प्रत्येकाला लढाईवर घेऊन गेले. पण युद्ध जिंकल्यावर राजा आम्हाला विसरला. आमचे हाल कुत्रे खात नाही पण राजा विजयी झाला.

राजाला खरी परिस्थिती समजली. प्रधानावर आंधळा विश्वास टाकल्यामुळे आपल्या हातून गरीब प्रजेवर अन्याय झाला हे त्याच्या मनाला फार लागलं. तो म्हणाला, आजी, आज तुम्ही माझे डोळे उघडलेत. अशा भ्रष्टाचारी लोकांना शिक्षा करीन, मी त्यांना पाठीशी घालणार नाही. मी तुम्हाला न्याय देईन.

**136.** ह्या गोष्टीत राजाची चूक कोणती ?

(1) त्याने युद्ध केले

(2) तो आजीबाईंच्या घरात डोकावला

(3) त्याने वेश बदलून फेरफटका मारला

(4) त्याने प्रधानावर आंधळा विश्वास टाकला

**137.** खजिन्यातलं धन कुठे गेलं ?

(1) युद्धात मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांना दिले

(2) खजिन्यातच लपवलेलं होते

(3) प्रधानानें त्याचा गैरवापर केला

(4) युद्धासाठी वापरलं

**138.** राजाने प्रधानावर कसली जबाबदारी टाकली ?

(1) खूप पैसा खर्च करण्याची

(2) युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांची काळजी घेण्याची

(3) राज्यात फेरफटका मारण्याची

(4) विजयोत्सव साजरा करण्याची

**139.** राजा भ्रष्टाचारी नोकरांना पाठीशी घालणार नाही म्हणजे

(1) तो त्यांच्या पाठीवर थाप मारणार नाही

(2) तो त्यांच्या दोषांवर पांघरूण घालणार नाही

(3) तो त्यांना पाठीमागे उभं राहू देणार नाही

(4) तो त्यांच्या मागे जाणार नाही

**140.** युद्धात कामी येणे म्हणजे

(1) युद्धात मरण पावणे

(2) युद्धाच्या कामासाठी प्रयाण करणे

(3) युद्धामध्ये काम करणे

(4) युद्धात उपयोगी पडणे

**141.** फेरफटका मारणे म्हणजे

(1) मारत मारत फेर धरणे

(2) फिरून येणे

(3) फेर धरून चालणे

(4) फेर धरून फटके मारणे

**142.** 'मनाला लागणे' म्हणजे

(1) मन मारणे

(2) मनात मांडे खाणे

(3) मनात भरणे

(4) वाईट वाटणे

**143.** "हाल कुत्रे खात नाही" म्हणजे

(1) कुत्र्याला खायला काहीही न मिळणे

(2) गावामध्ये कुणीही नसणे

(3) परिस्थिती अत्यंत वाईट असणे

(4) कुत्र्याला खाण्यासाठी खूप गोष्टी असणे

**144.** आजीने मुलाला झोपवण्यासाठी काय केले ?

(1) मांडीवर घेऊन थोपटले

(2) पाळण्यात घालूने झोपवले

(3) अंगाईगीत म्हटले

(4) पाणी उकळत ठेवून त्याला फसवले

***सूचना : खाली दिलेला उतारा वाचा आणि त्यानंतरच्या प्रश्नांची (प्र. क्र. 145 ते 150) उत्तरे द्या. त्याकरिता सर्वात जास्त उचित पर्याय वापरा.***

बाळ हळूहळू मोठा होत होता. आपल्या असामान्य बुद्धीने तो सर्वांना आश्चर्यचकित करत होता. त्याचे वडील गंगाधरशास्त्री त्याच्या बौद्धिक विकासाकडे लक्ष देतच होते त्याचबरोबर बाळ सत्यप्रिय, न्यायप्रिय आणि निर्भय झाला पाहिजे, असं त्यांना मनापासून वाटत होतं. बाळनी सुद्धा त्यांना निराश केलं नाही. अत्यंत बुद्धिमान पण कृश शरीरयष्टीचा बाळ धीट आणि निर्भय होता.

एके दिवशी शाळेच्या मधल्या सुट्टीत मुलांनी भुईमुगाच्या शेंगा आणल्या. त्या खाऊन त्यांची टरफले वर्गातच टाकली. सुट्टी संपल्यानंतर गुरुजी वर्गात आले. तिथे पडलेली शेंगांची टरफले पाहिल्यावर ते संतापले. आपली करडी नजर वर्गभर फिरवत त्यांनी विचारले, "शेंगा कोणी खाल्ल्या ?"

वर्गात कमालीची शांतता होती. गुरुजींच्या प्रश्नाचं उत्तर कोणीही दिलं नाही. गुरुजींनी वेताची छडी बाहेर काढली आणि प्रत्येक मुलाच्या हातावर छड्या मारायला सुरवात केली. बाळाच्या सर्व वर्गसोबत्यांनी छड्या खाल्ल्या. बाळजवळ येऊन गुरुजी म्हणाले, "बाळ हात पुढे कर." तेव्हा बाळ धीटपणे म्हणाला, "गुरुजी मी शेंगा खाल्ल्या नाहीत. मी छडी खाणार नाही !" गुरुजी संतापले व त्यांनी त्याला वर्गाच्या बाहेर जायंला सांगितले. बाळ लगेच वर्गाच्या बाहेर पडला घरी त्याच्या ह्या बाणेदारपणाचे कौतुक झाले. त्याच्या ह्या धिटाईबद्दल गंगाधरशास्त्र्यांनी त्याला शाबसकी दिली. अन्यायानी होणारी शिक्षा बाळनी स्वीकारली नाही. अन्याय सहन करायचा नाही हा बाणेदारपणा लोकमान्य टिळकांच्या अंगी बालपणापासूनच होता.

**145.** गुरुजी वर्गात आल्यावर संतापले कारण

(1) मुलांनी गृहपाठ केलेला नव्हता

(2) काही मुले पटांगणावर खेळत होती

(3) वर्गात टरफले पडलेली होती

(4) मुले खूप दंगा करत होती

**146.** गुरुजींनी बाळला बाहेर जायला सांगितले कारण

(1) बाळने शेंगा खाऊन वर्गात टरफले टाकली होती

(2) बाळने छडी खायला नकार दिला

(3) बाळ हसत होता

(4) बाळ शेजारच्या मुलाशी बोलत होता

**147.** वडील बाळवर रागावले नाहीत कारण

(1) बाळने अन्याय सहन केला नाही

(2) बाळ वडिलांचा लाडका होता

(3) बाळने शेंगा खाल्ल्या नव्हत्या

(4) बाळने निमूटपणे छड्या खाल्ल्या

**148.** बाणेदारपणा म्हणजे

(1) अन्याय सहन न करण्याची वृत्ती

(2) तडफदारपणा

(3) अचूक शरसंधान करण्याची कला

(4) असामान्य बुद्धिमत्ता

**149.** शरीरयष्टी म्हणजे

(1) क्रिकेट खेळताना यष्टीचीत होणे

(2) अशक्त माणूस

(3) धष्टपुष्ट शरीर

(4) अंगकाठी

**150.** ह्या उताऱ्यासाठी खालीलपैकी कोणती म्हण समपर्क आहे ?

(1) मुलाचे पाय पाळण्यात दिसतात

(2) बापसे बेटा सवाई

(3) मूर्ती लहान पण कीर्ती महान

(4) खाण तशी माती

# SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
2. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी ध्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
3. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
4. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
5. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
6. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/विची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
7. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
8. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
9. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
10. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
11. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
12. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. *चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

**READ CAREFULLY THE FOLLOWING INSTRUCTIONS :**

1. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with Blue/Black Ball Point Pen on Side-2 of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
2. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
3. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
4. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
5. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
6. Each candidate must show on demand his / her Admission Card to the Invigilator.
7. No candidate, without special permission of the Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
8. The candidates should not leave the Examination Hall without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet a second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case.
9. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
10. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
11. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
12. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room / Hall.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

SEAL

**निम्नलिखित निर्देश ध्यान से पढ़ें :**

1. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के पृष्ठ-2 पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह नीले/काले बॉल पॉइन्ट पेन से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
2. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
3. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
4. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
5. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश कार्ड के सिवाय किसी प्रकार की पाठ्य सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, काग़ज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
6. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-कार्ड दिखाएँ ।
7. अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
8. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा ।
9. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
10. परीक्षा-हॉल में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
11. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
12. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष / हॉल छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें ।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।***